जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

२४.०८.२०२६

वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २०५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

# जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आग : ३ चिमुकल्यांचा होरपळुन मृत्यू

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती** – अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशू कक्षात व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन ही आग लागली. ही आग वेगाने पसरली. यानंतर रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी शिशू कक्षात असलेल्या बालकांना बाहेर काढले. ही घटना घडली तेव्हा या कक्षात ९ बालके होती. मात्र, तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उर्वरित बालकांसह संपूर्ण नवजात शिशू कक्षातील इतर बालकांना जवळच असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या






घटनेनंतर बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष आमदार रवी राणा यांनी रुग्णालय प्रशासनावर सडकून टीका केली.

मी सकाळी साडेतीन वाजल्यापासून डॉक्टर आणि इतर लोकांच्या संपर्कात आहे. या आधी तीन वर्षांपूर्वी असीच आग लागली होती. तेव्हा जुन्या बिल्डिंगमधून नव्या इमारतीत शिफ्ट केलं, तिथे व्यवस्था करुन दिल्या. आज पुन्हा तशीच दुर्घटना झाली. हा रुग्णालयातील कर्मचारी, डॉक्टर आणि व्यवस्थेचा बेफिकीरपणा असल्याचा गंभीर आरोप आमदार रवी राणा यांनी केला.

नवजात बालकांचा अशाप्रकारे मृत्यू होणे दुर्दैवी घटना, याची चौकशी होईल, ज्या ज्या लोकांनी जबाबदारीने सांभाळायला पाहिजे होती. जेव्हा आग लागली होती पूर्वी तेव्हा मी आणि मुख्यमंत्र्यांनी नवीन इमारतीत सगळ्या व्यवस्था दिल्या, त्रुटी दूर केल्या. जे जे जबादार डॉक्टर, नर्स यांच्यावर कारवाई केली जाईल. आरोग्यमंत्र्यांनी याकडे लक्ष दिलं पाहिजे. फायर ऑडिट झालं नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. फायरब्रिगेडची गाडीही लेट पोहोचली, त्यावरही मी स्वत: कारवाई करणार असल्याचे रवी राणा यांनी सांगितले.

**अमरावतीमधील दुर्घटनेमुळे मी खूप दुःखी झालोय, माझं मन हेलावून गेलंय: चंद्रशेखर बावनकुळे**

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील या आगीच्या घटनेनंतर राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करुन आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी म्हटले की, अमरावतीमधील आजच्या दुर्घटनेमुळे मी खूप दुःखी झालो. माझे मन हेलावून गेले आहे. दगावलेल्या नवजात बालकांना अतिशय व्यथित अंतःकरणाने श्रद्धांजली व्यक्त करतो. त्यांच्या पालकांना हे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो, अशी प्रार्थना करतो. या घटनेच्या संपूर्ण चौकशीचे आदेश मी दिले आहेत. जे जखमी झाले त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना सर्व प्रकारची वैद्यकीय सहायता दिली जात असून, त्यांना लवकर आराम पडावा अशी सुविधा दिली जात आहे.

मृत बालकांच्या नातेवाईकांच्या पाठीशी सरकार उभे असून, सरकार व प्रशासन संपूर्ण मदत करत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या सतत संपर्कात असून, आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या आहेत. प्रशासन पूर्णपणे लक्ष ठेवून आहे. अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे चार वाजता लागलेल्या आगीत उपचार घेत असलेल्या तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. काही बालकांना पुढील उपचारांसाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्यांपैकी चार बालकांवर उपचार सुरू असून, एक गंभीर आहे.

आग लागताच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी धावपळ करीत इतर बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. आगीचे नेमके कारण अजून समजू शकलेले नाही. एसएनसीयूमध्ये कमी दिवसांचे, कमी वजनाचे आणि गंभीर अवस्थेतील नवजात बालकांवर उपचार सुरू असतात. मी जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून या घटनेचे तीव्र दुःख व्यक्त करतो.

**यशोमती ठाकूर यांच्याकडून चौकशीची मागणी**

जुन्या बिल्डिंगमध्ये काही दोष होते, म्हणून या नवीन बिल्डिंगचं नियोजन केलं. त्यात मोठ्या प्रमाणावर बेड्स उपलब्ध करून दिले. छखउण ची व्यवस्था केली. पण इथे जर इनव्हर्टर सप्लाय किंवा कनेक्शन सप्लायमधे हलगर्जीपणा झाला असेल तर त्याला माफ करता येणार नाही, असे वक्तव्य यशोमती ठाकूर यांनी केले . सप्लायर कोण होता, इनव्हर्टरमध्ये दोष होता का, व्हेंटिलेटरमध्ये दोष होता का याची चौकशी व्हायला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे.

**उपमुख्यमंत्र्यांकडून शोक**

अमरावतीतील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता विभागात पहाटेच्या सुमारास लागलेल्या आगीत नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. या दुर्घटनेत आपल्या निष्पाप बालकांना गमावलेल्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे.

# पुसला येथील अल्पवयीन युवतीसोबत बळजबरी संभोग, युवक अटकेत

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – अल्पवयीन युवतीला विविध प्रकारचे आमिष दाखवुन तिच्यासोबत जबरी संभोग केल्याप्रकरणी शेंदुरजनाघाट पोलिसांनी पुसला आदित्य अहेर नामक युवकाला अटक केली आहे.

याबाबत पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार, १८ वर्षीय फिर्यादी महिला ही तिचे आजीच्या पुसला या गावी गेली असता आरोपी आदित्यचे घरी कडी पत्ता फिर्यादी ही मांगण्यास गेली असता आरोपी आदित्य सोबत ओळख होवुन जबरदस्तीने बोलचाल करुन मोबाईल नंबर लिहुन दिला व वारंवार सवांद साधुन नंतर आरोपीने फिर्यादीचे घरी भेटण्याचे उदेदशाने बोलवुन फिर्यादी ही अल्पवयीन असताना



फिर्यादीने तिचेसोबत बळजबरी संभोग केला. त्यानंतर आरोपीने फिर्यादी सोबत वेगवेगळे बहाने करुन अनेकदा वारंवार जबरी संभोग केला तसेच सोशल मिडीयावर फोटो अपलोड करुन शिवीगाळ करुन 'तुझी पूर्ण लाईफ खराब करुन टाकीन', अशी धमकी दिली. 'तुझी जिंदगी आता माझा हातात आहे, तु पोलीस ठाण्यात जावुन दाखव' असे फिर्यादीने तिचे आईला घडलेला प्रकार सांगुन फिर्यादीच्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी आदित्य प्रदीप अहेर (३०) रा.पुसला याचे विरुध्द बलात्कारासह सहकलम ४, ६ बाललैंगिक अपराध संहिता अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली असुन पुढील तपास सुरु आहे.

या घटनेने पुसला गावामध्ये खळबळ माजली आहे.









# मानकापुरच्या पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपुर** – मानकापूर येथील लोटस कल्चरल अँड स्पोर्टिंग असोसिएशनतर्फे शिवमंदिर परिसरात आयोजित पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भेट दिली. मुख्यमंत्र्यांनीही या उपक्रमात सहभागी होऊन तीन शिवलिंगांची निर्मिती केली.



मंत्रोच्चाराच्या जयघोषात मुख्यमंत्र्यांनी प्रथम शिवलिंगाचे दर्शन घेतले. या सोहळ्याचे संयोजक दयाशंकर तिवारी, अनिल बावनगडे, अमोल कोल्हे, आशिष पाली, नवीन जैन, प्रभाकर ठाकरे व समितीचे सदस्य उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीतील शिवआराधनेचे महत्त्व अधोरेखित करत मुख्यमंत्री म्हणाले, श्रावण महिन्यात आयोजित या सोहळ्यामुळे परिसरातील वातावरण पवित्र झाले असून येथे महिला पुरुषांसह दिव्यांगजन आणि बालकेदेखील पार्थिव शिवलिंगाची निर्मिती करीत असल्याचे दृश्य प्रसन्नता निर्माण करणारे आहे. भारतीय संस्कृतीत शिवआराधना महत्त्वाची मानली जाते. आदी–अनंताचे प्रतीक म्हणजे शिव. या शिवपूजेतून आत्मिक शांतता व मानसिक स्थैर्य प्राप्त होत आहे. यावर्षीच्या उपक्रमात ९१ लक्ष पार्थिव शिवलिंग निर्मिती करण्यात येणार असून महिनाभर चालणाऱ्या या सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. १३ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याचे हे तिसरे वर्ष असून यंदा ९१ लाख पार्थिव शिवलिंग निर्मितीचा संकल्प सोडण्यात आला आहे. शिवलिंगांसाठी गंगा तीरावरून माती येथे आणण्यात आली असून दररोज सूर्यास्तानंतर ह्या पार्थिव शिवलिंगांचे विसर्जन करण्यात येते. दि १२ सप्टेंबर रोजी यज्ञ व महाप्रसादाने ह्या सोहळ्याची सांगता होणार असल्याचे दयाशंकर तिवारी यांनी सांगितले.

# स्व.दिनेश गायवाड यांच्या कुटुंबियांचे खासदार अमर काळे यांनी केले सांत्वन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वर्धा** – काँग्रेसचे समर्थक तथा खासदार अमर काळे यांचे निकटवर्तीय सुनीलभाऊ गायवाड यांचे बंधू स्व.दिनेश गायवाड यांच्या आकस्मिक निधनाने गायवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखद प्रसंगी खासदार अमर काळे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

स्वर्गीय दिनेश गायवाड हे ५६ वर्षांचे होते. ते सहकार क्षेत्रात कार्यरत होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी तसेच भाऊ आणि अन्य कुटुंबीय असा परिवार आहे. त्यांच्या अचानक निधनाने कुटुंबीयांवर मोठे संकट ओढवले आहे.

खासदार अमर काळे यांनी स्वर्गीय दिनेश गायवाड यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना या दुःखातून सावरण्यासाठी धीर दिला.

यावेळी खासदार अमर काळे यांनी, स्व.दिनेश गायवाड यांच्या निधनाने मनाला अत्यंत वेदना झाल्या आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि गायवाड कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना केली.

यावेळी स्वर्गीय दिनेश गायवाड यांचे ज्येष्ठ बंधू सुनीलभाऊ गायवाड तसेच कुटुंबीय, नातेवाईक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



# शिक्षिका सविता विजयराव खोडस्कर यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद शाळा पंढरी येथील शिक्षिका सविता विजयराव खोडस्कर यांचे काल (ता.२२) ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ४६ वर्षे होते.



आदर्श शिक्षिका म्हणुन त्यांचा शिक्षणक्षेत्रात लौकिक होता. त्या विद्यार्थी प्रिय शिक्षिका होत्या. जिल्हा परिषद शिक्षक विजय खोडस्कर यांच्या त्या सुविद्य पत्नी होत. त्यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, पती व बराच मोठा आप्त परिवार आहे.

शहरातील स्वावलंबी नगर या त्यांच्या राहते घरुन अंत्ययात्रा काढण्यात येवुन त्यांच्या पार्थिवावर केदारेश्वर मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शिक्षण क्षेत्रातील शिक्षक मंडळी, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

# आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक मनोज राऊत यांचा सेवापूर्तीनिमित्त मित्रमंडळीच्या वतीने भावपूर्ण सत्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – प्रदीर्घ, समर्पित व कर्तव्यनिष्ठ शैक्षणिक सेवेतून हजारो विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार व शिस्तीची दिशा देणारे आदर्श शिक्षक तथा मुख्याध्यापक मनोज देविदासराव राऊत यांच्या सेवापूर्तीनिमित्त अभियंता भवन येथे कुटुंबीय व श्री गजानन महाराज पारायण समितीच्या मित्र परिवारातर्फे भावपूर्ण सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक



डॉ. गोविंदभाऊ कासट व मुख्याध्यापक दिलीप सदार यांच्या हस्ते मनोज राऊत व त्यांच्या सौ. उज्वला यांचा शाल, 'शहीद उपेंद्र गुळघेकर' हे पुस्तक तसेच दिलीप सदार यांनी राऊत सरांच्या कार्याविषयी लिहिलेला लेख फोटोफ्रेममध्ये प्रदान करून त्यांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला.

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती अंतर्गत भंडारा जिल्ह्यातील सिहोरा, ता. तुमसर येथील महाराष्ट्र हायस्कूलमध्ये प्रदीर्घ काळ शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून कार्यरत राहिलेल्या राऊत यांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या या मूल्याधिष्ठित कार्यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला ज्ञानाची व संस्कारांची भक्कम दिशा मिळाली. जवळा शहापूर येथील रहिवासी असलेल्या राऊत यांनी शिक्षण क्षेत्रासोबतच सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये गंभीर जखमी तरुणावर यशस्वी शस्त्रक्रिया

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – धारणी येथील २८ वर्षीय तरुणावर अस्वलाच्या हल्ल्यात झालेल्या अत्यंत दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या डोके व चेहऱ्याच्या दुखापतीवर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.

अस्वलाच्या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली होती. त्याच्या टाळूचा मोठा भागावर इजा झालेल्या होत्या,तसेच कवटीच्या पुढील व बाजूच्या भागाला गंभीर फ्रॅक्चर होऊन मेंदूचा काही भाग उघडा पडला होता.



चेहऱ्याच्या हाडांनाही गंभीर दुखापत झाली होती.

शस्त्रक्रियेदरम्यान जखमेची काळजीपूर्वक तपासणी करून ती पूर्णपणे स्वच्छ करण्यात आली. मृत ऊती काढून टाकण्यात आल्या. कवटीच्या फ्रॅक्चरची दुरुस्ती करून टाळूचा निखळलेला, मात्र जिवंत असलेला भाग जतन करण्यात आला.

टाळूची पुनर्रचना करण्यासाठी मागील बाजूस आधार असलेल्या स्कॅल्प फ्लॅप तंत्राचा वापर करण्यात आला. त्यामुळे कवटीचा उघडा भाग आणि दुराची दुरुस्ती झालेल्या जागेला तणावमुक्त व पुरेसा रक्तपुरवठा असलेले आवरण मिळाले. तसेच टाळूच्या मागील भागातील रक्तवाहिन्यांचा रक्तपुरवठा कायम राखण्यात आला.

वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे संसर्गाचा वाढलेला धोका यामुळे हे प्रकरण वैद्यकीयदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक होते. मात्र, तज्ज्ञांच्या समन्वयातून शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली.

वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सागर भुतडा, डॉ.अभिजीत बेले, डॉ.दिपाली देशमुख, डॉ.अश्विनी मडावी, चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार दिपाली देशमुख, मनीषा रामटेके, दीपिका वाठोडकर, राहुल वायझाडे, शुभम गवई, विजय गवई, अभिजित निचत , यश गवई, सुमित शिरसाट, राहुल कावनपुरे, नंदलाल राठोड, साकिब, ज्ञानेश लांजेवार यांचे शस्त्रक्रियेत महत्त्वपूर्ण योगदान होते.

# मेळघाट दुर्गम, अतिदुर्गम आरोग्य कर्मचारी संघटना राज्य कार्यकारिणी स्थापन

## अध्यक्षपदी धर्मा वानखडे तर सचिवपदी अनिल पटोरकर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**धारणी** – १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मातोश्री इंदिरा महाविद्यालय येथे अधिकृत सभा घेऊन मेळघाट/दुर्गम, अतिदुर्गम आरोग्य कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य. स्थापना करण्यात आली. सर्वप्रथम भगवान बिरसा मुंडा व शहीद भगतसिंग यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. सर्वानुमते अध्यक्षपदी धर्मा वानखडे तर सचिवपदी अनिल पटोलकर यांची निवड करण्यात आली.

तसेच कार्याध्यक्ष प्रितेश मावस्कर, उपाध्यक्ष मीना कासदेकर, कोषाध्यक्ष स्वाती राठोड, संघटक वसंत धुर्वे तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणुन रामकू भिलावेकर, सुवर्णा धांडेकर, रवींद्र बेलसरे, संजू कासदेकर, सिंधू भिलावेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सभेला अशोक धांडे, मंजू खंडेलवाल, आकाश सोळंके, दिप्ती श्रीवास, संगीता धांडे, रुकमा जांभेकर, गायत्री श्रीवास, चारू वानखडे, सुमती ढीमरेकर, एस.डी. मावस्कर, एस.एस.गवई, प्रमिला मिलावेकर, भारती इंगळे, संतोष कासदेकर उपस्थित होते तसेच मेळघाट मधील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समस्या बाबत चर्चा करण्यात आली.

# रुग्णांच्या नातेवाईकांना दर्जेदार व्यवस्था मिळण्यासाठी मुख्यमंत्र्यांचा पुढाकार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नागपूर** – राज्यभरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांची सोय व्हावी आणि त्यांना अधिक चांगल्या सेवा–सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करणाऱ्या विविध धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.



मोठ्या रुग्णालयांमध्ये दररोज हजारो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येत असतात. बऱ्याचदा उपचाराचा मोठा खर्च, राहण्याची आणि जेवणाची सोय तसेच योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. हीच बाब लक्षात घेऊन या सर्व घटकांना एकाच छताखाली आणून एक सुटसुटीत आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या करारामुळे धर्मादाय रुग्णालये आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मिळणारी मदत थेट आणि वेळेत रुग्णांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचवणे शक्य होणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांवर मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार केले जातात. या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची यंत्रणा जोडली जाणार आहे. रुग्णालयांच्या परिसरात नातेवाईकांसाठी निवारा, अल्पदरात, मोफत भोजन आणि वैद्यकीय मार्गदर्शनाची सोय अधिक प्रभावीपणे केली जाईल.

## लोणीच्या वं.वसंतदास महाराज सहकारी पतसंस्थेची

# २२ वी वार्षिक साधारण सभा मोठ्या उत्साह आणि आनंदात साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – वं.वसंतदास महाराज सहकारी पतसंस्था लोणीची २२ वी वार्षिक साधारण सभा नुकतीच लक्ष्मी नारायण सभागृह लोणी येथे संपन्न झाली.




सभेमध्ये संस्थेच्या ४९२ सभासदांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा अभ्यास तसेच सभासदांची कर्तव्य व जबाबदारी याविषयी अमरावतीच्या सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य गवळी यांनी दिली. सभेची प्रस्तावना सुधीर ढोले यांनी केली. वार्षिक अहवालाचे वाचन संस्था व्यवस्थापक प्रवीण मेंढे तसेच सभेला मार्गदर्शन वासुदेवराव पोहरकर यांनी केले. अध्यक्ष गोपाल मालपे यांनी संस्थेने २२ वर्षांमध्ये केलेले उल्लेखनीय कार्याचा उल्लेख केला. संस्थेला बावीस वर्षांमध्ये सभासद व हितचिंतकांच्या सहकार्याने राज्य व विदर्भस्तरीय १८ पुरस्कार प्राप्त झालेले आहे. संस्था आर्थिक व्यवहारासोबतच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक क्षेत्रामध्ये विविध शिबिराच्या माध्यमातून कार्य करीत आहे. संस्थेने या आर्थिक वर्षामध्ये ९५ कोटी रुपयांचा व्यवसाय केलेला असुन ५२ लाख रुपये नफा मिळविलेला आहे. सभेला पतसंस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष गोपाल उर्फ सुभाषराव मालपे, उपाध्यक्ष वासुदेव पोहरकर, योगेश वांगे, लक्ष्मीकांत काळे, अरुण खेरडे, सुधीर ढोले, सुधीर बायमोरे, संजय गुल्हाने, दामोदर आंडे, प्रकाशराव मालपे, आशाताई देशमुख व व्यवस्थापक प्रवीण मेंढे उपस्थित होते. यशस्वी आयोजन करता संस्था कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# संपादकीय

**यश मिळविण्यासाठी परिस्थिती नव्हे तर स्वत: बदलण्याची गरज असते**

## राहुल गांधी यांची पुण्यातील सभा म्हणजे तरुणांच्या अपेक्षांची कसोटी

पुणे ही केवळ महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि शैक्षणिक राजधानी नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या विचारांची भूमीही आहे. अशा पुणे शहरात काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २२ ऑगस्ट रोजी केलेला दौरा त्यामुळेच राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरतो. 'छात्रों की गूंज' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनी आणि तरुणांशी थेट संवाद साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शिक्षण, रोजगार, स्पर्धा परीक्षा, महिलांची सुरक्षितता आणि तरुणांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांना या संवादातून केंद्रस्थानी आणण्यात आले.

आजचा तरुण वर्ग राजकीय भाषणांपेक्षा आपल्या भवितव्याशी संबंधित ठोस उत्तरांची अपेक्षा करतो. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या संधी कुठे आहेत, सरकारी नोकऱ्यांसाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता किती आहे, परीक्षांच्या तारखा आणि निकालांमधील अनिश्चितता का निर्माण होते, तसेच शिक्षणाचा वाढता खर्च सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी किती परवडणारा आहे, हे प्रश्न सर्वसामान्य तरुणांच्या चिंतेचे विषय आहेत.

राहुल गांधी यांनी पुण्यात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना याच प्रश्नांना राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला. हा केवळ काँग्रेसचा राजकीय कार्यक्रम म्हणून पाहण्याऐवजी, देशातील तरुणांच्या अपेक्षा आणि अस्वस्थता व्यक्त करण्यासाठी निर्माण झालेला एक सार्वजनिक संवाद म्हणूनही त्याकडे पाहता येईल.

मात्र, प्रश्न मांडणे आणि त्यावर ठोस उपाय देणे यात मोठा फरक आहे. तरुणांच्या समस्या ऐकून घेणे आवश्यक आहेच; परंतु त्या समस्यांवर रोजगारनिर्मितीची स्पष्ट दिशा, शिक्षणव्यवस्थेतील सुधारणा, स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता आणि कौशल्याधारित रोजगाराच्या संधी याबाबत राजकीय पक्षांनी ठोस आराखडा मांडणे अधिक महत्त्वाचे आहे.

राहुल गांधींच्या पुणे दौऱ्याला राजकीय रंगही मिळाला. कार्यक्रमाला पोलिसांनी विविध अटींसह परवानगी दिल्याची माहिती समोर आली, तर दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपही झाले. कार्यक्रमाच्या निधीवरून भाजपकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आणि काँग्रेसने त्याला प्रत्युत्तर दिले.

हीच बाब भारतीय लोकशाहीतील सध्याच्या राजकारणाचे वास्तव अधोरेखित करते. एखादा नेता जनतेशी संवाद साधतो, तेव्हा त्याच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याऐवजी कार्यक्रम कोणाचा, खर्च किती, गर्दी किती आणि त्यामागे राजकीय हेतू काय, यावर राजकीय वाद अधिक रंगतो. ही परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. पुण्याची विद्यार्थी चळवळ आणि सामाजिक परिवर्तनाची परंपरा लक्षात घेता, तरुणांनीही राजकीय नेत्यांना कठोर प्रश्न विचारणे आवश्यक आहे. केवळ घोषणा किंवा भाषणांवर समाधान न मानता, रोजगारासाठी काय योजना आहे, शिक्षणाचा दर्जा कसा सुधारणार, परीक्षा पद्धती अधिक विश्वासार्ह कशी करणार आणि महिलांना सुरक्षित व समान संधी कशा मिळणार, याची उत्तरे मागणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

राहुल गांधींच्या पुणे दौऱ्याचा सर्वात महत्त्वाचा पैलू हा तरुणांच्या आवाजाला राजकीय व्यासपीठ देण्याचा प्रयत्न आहे. मात्र या आवाजाचे रूपांतर धोरणांमध्ये आणि धोरणांचे रूपांतर प्रत्यक्ष परिणामांमध्ये झाले, तरच अशा दौऱ्याचे खरे महत्त्व सिद्ध होईल. आज देशातील तरुणांना भावनिक राजकारणापेक्षा शिक्षण, रोजगार, संधी आणि सुरक्षित भविष्य हवे आहे. त्यामुळे पुण्यात झालेला संवाद हा केवळ एका दिवसाचा राजकीय कार्यक्रम न राहता, तरुणांच्या प्रश्नांवर सातत्याने राष्ट्रीय चर्चा घडवून आणणारा टप्पा ठरतो का, हे आगामी काळात पाहावे लागेल.

शेवटी, पुण्याने राहुल गांधींना ऐकले; आता प्रश्न असा आहे की राहुल गांधी आणि काँग्रेस तरुणाईचे हे ऐकलेले प्रश्न कृतीच्या राजकारणात कितपत रूपांतरित करतात? आणि त्याचबरोबर सत्ताधारी पक्षही या प्रश्नांना किती गांभीर्याने उत्तर देतो? कारण विद्यार्थ्यांचे प्रश्न हे कोणत्याही एका पक्षाचे नसून, देशाच्या भवितव्याचे प्रश्न आहेत. राहुल गांधींच्या पुणे दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि तरुणांच्या प्रश्नांना पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याची संधी निर्माण झाली आहे. पुणे हे देशातील महत्त्वाचे शिक्षणकेंद्र असल्याने येथून उमटणारा विद्यार्थ्यांचा आवाज राज्यभर पोहोचतो.

आज लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. वर्षानुवर्षे मेहनत करूनही परीक्षा पुढे ढकलणे, निकालातील विलंब आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे तरुणांमध्ये अस्वस्थता आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी केवळ आश्वासने न देता रोजगारनिर्मितीचा स्पष्ट कार्यक्रम मांडणे गरजेचे आहे.

✻ अभिनेते जन्म दिन विशेष

# संघर्षातून यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या अनिल कपूर यांचा प्रेरणादायी प्रवास

भारतीय चित्रपटसृष्टीत अनेक कलाकार आले आणि काळाच्या ओघात विस्मृतीत गेले; मात्र काही कलाकार आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. अनिल कपूर हे अशाच सदाबहार कलाकारांपैकी एक आहेत. आपल्या दमदार अभिनयाने, प्रभावी व्यक्तिमत्त्वाने आणि प्रत्येक भूमिकेला वेगळा रंग देण्याच्या क्षमतेने त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली.

अनिल कपूर यांचा जन्म २४ डिसेंबर १९५६ रोजी मुंबई येथे झाला. चित्रपटसृष्टीशी संबंधित कुटुंबातून आले असले तरी अभिनयाच्या क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. सुरुवातीच्या काळात छोट्या भूमिका स्वीकारत त्यांनी आपल्या अभिनयाची जडणघडण केली. दक्षिण भारतीय चित्रपटातूनही त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली.

हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांना खरी ओळख मिळवून देणाऱ्या चित्रपटांमध्ये 'वो सात दिन'चा विशेष उल्लेख करावा लागतो. या चित्रपटातील त्यांच्या सहज आणि भावपूर्ण अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर 'मेरी जंग', 'मिस्टर इंडिया', 'तेजाब', 'राम लखन', 'परिंदा', 'लम्हे', 'बेटा', 'नायक' यांसारख्या चित्रपटांनी त्यांच्या अभिनयाची व्याप्ती सिद्ध केली.

'मिस्टर इंडिया'मधील अरुण ही व्यक्तिरेखा आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. त्याचप्रमाणे 'तेजाब'मधील मुन्ना, 'राम लखन'मधील लखन आणि 'नायक'मधील शिवाजी राव ही पात्रे त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे ठरली. विनोदी, भावनिक, गंभीर, रोमँटिक तसेच ॲक्शन भूमिका त्यांनी तितक्याच प्रभावीपणे साकारल्या.



अनिल कपूर यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे भूमिकेनुसार स्वत:मध्ये बदल करण्याची त्यांची तयारी. पडद्यावर ते केवळ संवाद बोलत नाहीत, तर व्यक्तिरेखेचा स्वभाव, तिच्या भावना आणि तिची मानसिकता प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतात. त्यामुळे त्यांच्या भूमिका अनेकदा चित्रपट संपल्यानंतरही लक्षात राहतात. चित्रपटांसोबतच त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या अभिनयाची छाप उमटवली. 'स्लमडॉग मिलियनेअर' या ऑस्करविजेत्या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेमुळे त्यांना जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली. त्यानंतर हॉलीवूडमधील काही महत्त्वाच्या प्रकल्पांमध्येही त्यांनी काम केले.अनिल कपूर यांचा प्रवास केवळ एका अभिनेत्याचा प्रवास नाही; तो सातत्य, मेहनत आणि स्वत:ला सतत नव्याने सिद्ध करण्याचा प्रवास आहे. अनेक दशकांनंतरही त्यांची ऊर्जा आणि कामाविषयीची बांधिलकी तरुण कलाकारांसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या काळातही ते चित्रपट, वेब सीरिज आणि विविध माध्यमांमधून सक्रिय आहेत. बदलत्या काळानुसार अभिनयाची शैली आणि माध्यमे बदलली, तरी अनिल कपूर यांनी स्वत:ला त्या बदलांशी जुळवून घेतले. हीच त्यांच्या दीर्घ कारकिर्दीची मोठी ताकद आहे. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही कुटुंबाला महत्त्वाचे स्थान आहे. पत्नी सुनीता कपूर, मुलगी सोनम कपूर, मुलगी रिया कपूर आणि मुलगा हर्षवर्धन कपूर यांच्यासह कपूर कुटुंबाचा चित्रपटसृष्टीशी असलेला संबंध पुढेही कायम आहे. २४ डिसेंबर हा त्यांचा जन्मदिवस. या निमित्ताने त्यांच्या कारकिर्दीकडे पाहिले असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवतेड्ढवय वाढले तरी अभिनयाची भूक आणि उत्साह कमी झाला नाही. हीच गोष्ट त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते. अनिल कपूर हे केवळ एक यशस्वी अभिनेते नाहीत, तर भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक पिढ्यांना जोडणारा एक सदाबहार चेहरा आहेत. संघर्षातून मिळवलेले यश, भूमिकांमधील वैविध्य, कामाप्रती असलेली निष्ठा आणि सतत स्वत:ला सिद्ध करण्याची वृत्ती यामुळे त्यांचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी आहे. अभिनयाच्या पडद्यावर अनेक चेहरे येतील-जातील; मात्र काही चेहरे काळाच्या पलीकडे जाऊन प्रेक्षकांच्या मनात कायमचे घर करतात. अनिल कपूर हे त्यापैकीच एक नाव आहे.

# साधेपणा, नम्रता आणि सुरांनी जग जिंकणाऱ्या महान गायकाची प्रेरणादायी कहाणी

भारतीय संगीतविश्वाच्या इतिहासात काही स्वर असे आहेत, ज्यांना काळाची मर्यादा नसते. दशकं उलटली, संगीताच्या शैली बदलल्या, नवे गायक आले; मात्र मोहम्मद रफी यांचा आवाज आजही तितकाच ताजा, भावपूर्ण आणि मनाला भिडणारा वाटतो. प्रेम, विरह, भक्ती, देशभक्ती, मैत्री, आनंद आणि दु:खड्ढमानवी भावनांच्या असंख्य छटा आपल्या आवाजातून व्यक्त करणारे रफी हे भारतीय चित्रपटसृष्टीतील महान गायकांपैकी एक होते.

**संघर्षातून सुरांच्या विश्वात प्रवेश**

मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ रोजी पंजाबमधील कोटला सुलतान सिंह येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना संगीताची विशेष आवड होती. त्यांच्या आवाजातील गोडवा आणि गायनाची नैसर्गिक क्षमता लहान वयातच जाणवू लागली.

त्यांच्या कुटुंबाचे नंतर लाहोरकडे स्थलांतर झाले. तेथे त्यांना संगीताचे प्राथमिक शिक्षण मिळाले. पुढे त्यांनी विविध संगीतगुरूंकडून शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतले. संगीताची साधना आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी गायनाच्या क्षेत्रात स्वत:ची वाट निर्माण केली.

**मुंबईत आगमन आणि चित्रपटसृष्टीतील सुरुवात**

रफी यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश



केल्यानंतर सुरुवातीला त्यांना फार मोठ्या संधी सहज मिळाल्या नाहीत. मात्र त्यांच्या आवाजातील वेगळेपणा संगीतकारांच्या लक्षात येऊ लागला. नौशाद यांसारख्या संगीतकारांनी त्यांच्या प्रतिभेला योग्य व्यासपीठ दिले आणि त्यानंतर रफी यांच्या कारकिर्दीला वेग मिळाला.

'बैजू बावरा'सारख्या चित्रपटांतील गाण्यांनी त्यांच्या गायकीची ताकद सिद्ध केली. त्यानंतर ते हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे पार्श्वगायक बनले.

**प्रत्येक भावनेसाठी वेगळा आवाज**

मोहम्मद रफी यांच्या गायकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा आवाज परिस्थितीनुसार बदलत असे.

रोमँटिक गाण्यात त्यांचा आवाज प्रेमळ आणि हळुवार वाटे; विरहगीतांमध्ये तो दु:खाची तीव्रता व्यक्त करी; भक्तिगीतांमध्ये श्रद्धेची अनुभूती देई; तर देशभक्तीपर गीतांमध्ये त्यांच्या आवाजात जोश आणि अभिमान जाणवत असे.

'चौदहवीं का चाँद हो', 'क्या हुआ तेरा वादा', 'चुरा लिया है तुमने', 'बहुत शुक्रिया बड़ी मेहरबानी', 'ये दुनिया ये महफिल', 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया' यांसारख्या असंख्य गीतांनी त्यांच्या आवाजाला अमरत्व दिले.

**नायक बदलला, आवाज तोच भावला**

रफी यांनी अनेक दशकांमध्ये विविध अभिनेत्यांसाठी पार्श्वगायन केले. दिलीप कुमार, देव आनंद, राजेंद्र कुमार, शम्मी कपूर, धर्मेंद्र, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांच्यासह अनेक अभिनेत्यांच्या पडद्यावरील व्यक्तिमत्त्वाला त्यांनी आपल्या आवाजाने प्रभावीपणे साथ दिली. विशेष म्हणजे प्रत्येक अभिनेत्यासाठी त्यांचा आवाज वेगळा भासायचा. शम्मी कपूर यांच्या उत्साही आणि खट्याळ भूमिकांसाठी त्यांनी गायलेली गाणी असोत किंवा दिलीप कुमार यांच्या भावनिक भूमिकांसाठीची गाणी असोत रफी यांनी प्रत्येक व्यक्तिरेखेचा भाव आपल्या आवाजातून जिवंत केला.

**शास्त्रीय संगीतावर मजबूत पकड**

रफी यांचे गायन केवळ चित्रपटगीतांपुरते मर्यादित नव्हते. भारतीय शास्त्रीय संगीतावर त्यांची मजबूत पकड होती. त्यामुळे अवघड रागदारीवर आधारित गाणीही त्यांनी सहजतेने गायली.

त्यांच्या आवाजातील पट्टी, लय, उच्चारांची स्पष्टता आणि भावनिक अभिव्यक्ती यांचे विलक्षण मिश्रण त्यांच्या गायकीत दिसून येते. त्यामुळे संगीतकारांसाठी रफी हे अत्यंत विश्वासार्ह गायक होते.

**पुरस्कार आणि सन्मान**

मोहम्मद रफी यांच्या असामान्य योगदानाचा गौरव अनेक पुरस्कारांनी करण्यात आला. त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच 'बाबुल की दुआएँ लेती जा' या गीतासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांच्या कारकिर्दीत अनेक फिल्मफेअर पुरस्कारही त्यांच्या नावावर जमा झाले. मात्र रफी यांच्यासाठी पुरस्कारांपेक्षा श्रोत्यांचे प्रेम आणि संगीताची साधना अधिक महत्त्वाची होती.

**प्रसिद्धीच्या शिखरावर असूनही साधेपणा**

रफी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात प्रेरणादायी पैलू म्हणजे त्यांचा साधेपणा आणि नम्रता. प्रचंड लोकप्रियता मिळूनही त्यांनी स्वत:ला कधीही मोठे समजले नाही. सहकलाकार, संगीतकार आणि तंत्रज्ञ यांच्याशी ते अत्यंत नम्रपणे वागत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही नम्रता त्यांच्या आवाजाइतकीच लोकांच्या मनात घर करून राहिली.

**शेवटच्या काळापर्यंत संगीताची साधना**

मोहम्मद रफी यांनी आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत गायन सुरू ठेवले. ३१ जुलै १९८० रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वावर मोठी शोककळा पसरली.

मात्र कलाकार शरीराने जातो; त्याची कला मात्र कायम राहते. रफी यांच्या बाबतीत हे अगदी खरे ठरले.

आजही प्रत्येक पिढीच्या ओठांवर रफी आज संगीत ऐकण्याची साधने बदलली आहेत. रेडिओच्या जागी मोबाईल आणि डिजिटल प्लॅटफफॉर्म आले आहेत. गाण्यांच्या शैली बदलल्या आहेत. तरीही रफींची गाणी आजच्या पिढीतील तरुणही तितक्याच आवडीने ऐकतात. त्यांचा आवाज ऐकताना श्रोत्याला केवळ गाणे ऐकू येत नाही, तर एक भावना अनुभवायला मिळते. हीच त्यांच्या कलेची खरी ताकद आहे.

**अजरामर स्वर**

मोहम्मद रफी यांचा जन्मदिवस २४ डिसेंबर. त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना त्यांच्या संगीताचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

रफी हे केवळ पार्श्वगायक नव्हते. ते भारतीय संगीताच्या सुवर्णयुगाचा एक अविभाज्य अध्याय होते. त्यांच्या आवाजाला काळाची सीमा नाही, त्यांच्या गाण्यांना भाषेची अडचण नाही आणि त्यांच्या सुरांना मृत्यूची मर्यादा नाही. मोहम्मद रफींचा स्वर आजही घुमतो आहे. आणि पुढील अनेक पिढ्यांच्या हृदयातही तो असाच घुमत राहील. सुरांच्या या महान बादशहाला विनम्र अभिवादन!

# भारतीय चित्रपटसृष्टीचा शोमॅन : राज कपूर

भारतीय चित्रपटसृष्टीचा इतिहास लिहिताना राज कपूर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहावे लागते. अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता आणि उत्तम कथाकार म्हणून त्यांनी हिंदी सिनेमाला नवी दिशा दिली. त्यांच्या चित्रपटांमध्ये मनोरंजनासोबतच सामाजिक वास्तव, माणुसकी, प्रेम, संघर्ष आणि सामान्य माणसाची स्वप्ने यांचे प्रभावी चित्रण दिसून येते.

१४ डिसेंबर १९२४ रोजी पेशावर येथे जन्मलेल्या राज कपूर यांना अभिनयाचा वारसा वडील पृथ्वीराज कपूर यांच्याकडून मिळाला. बालकलाकार म्हणून सुरुवात केल्यानंतर त्यांनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. पुढे त्यांनी 'आर.के. फिल्म्स'ची स्थापना करून निर्मिती आणि दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही मोठे योगदान दिले.

'आवारा' आणि 'श्री ४२०' हे त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचे दगड ठरले. या चित्रपटांतील सामान्य माणसाची भूमिका केवळ भारतातच नव्हे, तर



परदेशातही लोकप्रिय झाली. त्यांच्या चेहऱ्यावरील निरागसता, अभिनयातील सहजता आणि सामाजिक संदेश यामुळे त्यांचे पात्र सर्वसामान्यांच्या मनाशी जोडले गेले. राज कपूर यांच्या चित्रपटांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संगीत. संगीतकार शंकर-जयकिशन, गीतकार शैलेंद्र आणि हसरत जयपुरी तसेच गायक मुकेश यांच्यासोबत त्यांनी निर्माण केलेली गाण्यांची जादू आजही रसिकांच्या मनात कायम आहे. 'मेरा जूता है जापानी', 'आवारा हूँ' यांसारखी गाणी आजही लोकप्रिय आहेत. राज कपूर यांनी प्रेमकथेच्या माध्यमातून सामाजिक विषमता, गरिबी आणि माणसामाणसातील भेद यांसारखे विषयही मांडले. त्यामुळे त्यांचा सिनेमा केवळ मनोरंजन करणारा नव्हता, तर समाजाचा आरसाही होता. त्यांच्या कलेची दखल देश-विदेशात घेतली गेली. पद्मभूषण आणि दादासाहेब फाळके पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. भारतीय चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देणाऱ्या कलाकारांमध्ये त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. २ जून १९८८ रोजी राज कपूर यांचे निधन झाले, मात्र त्यांच्या कलाकृती आजही जिवंत आहेत. त्यांच्या चित्रपटांतील भावना, संगीत आणि सामाजिक विचार नव्या पिढीलाही आकर्षित करतात. राज कपूर यांचे मोठेपण त्यांच्या लोकप्रियतेतच नव्हते, तर सामान्य माणसाच्या आयुष्याला पडद्यावर सन्मानाने स्थान देण्यात होते. म्हणूनच भारतीय सिनेमाचा इतिहास राज कपूर यांच्या योगदानाशिवाय अपूर्ण आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्ता यावर आधारीत जगातील सर्वात मोठी असलेली इंडिया स्कील स्पर्धा २०२६ आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जगातील सर्वात मोठ्या कौशल्य स्पर्धा पैकी एक असलेल्या इंडिया स्कील कॉम्पिटिशन २०२६-२७ मध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील तरुणांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्ता स्पर्धा असून जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही ऑलिम्पिक खेळासारखी आहे. भारत सरकारच्या नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली ही देशातील अत्यंत प्रतिष्ठित कौशल्य स्पर्धा आहे.

# राजुरा बाजार पाणीपुरवठा योजनेचा केबल तिसऱ्यांदा लंपास : पाणीपुरवठा विस्कळीत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**राजुरा बाजार** – राजुरा बाजार ११ गांवे पाणीपुरवठा योजनेच्या विहीरीतील विद्युत पंपचा केबल सातत्याने चोरीला जात असल्यामुळे त्याचा परिणाम राजुरा बाजार गावातील पाणीपुरवठयावर होत असून चोरटयांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करावा, अशी मागणी राजुरा बाजारचे सरपंच तथा प्रशासक निलेश धुर्वे यांनी केली आहे.

निलेश धुर्वे यांनी बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत नमुद केले आहे की, राजुरा बाजार ग्रामपंचायतच्या मालकीच्या हातुर्णा येथील ११ गांव पाणीपुरवठा योजनेच्या विहीरीवरील विद्युत पंपाचा केबल दोन वेळा चोरीला गेला आहे. दोनदी पोलिस स्टेशनला तक्रारी दिल्या परंतु २१ ऑगस्टच्या रात्रीच्या सुमारास पुन्हा केबल चोरीला गेला आहे. यामध्ये दोन ६० एच.पी.मोटरचे केबल १०० फूट आणि २१ च्या रात्री झालेल्या चोरीत १०० फूट असे एकूण २०० फूट केबल चोरीला गेला आहे. आतापर्यंत झालेल्या चोरीमध्ये एकूण १ लक्ष २ हजार रुपयांचा केबल चोरीला गेला आहे व चोरटयांनी विहीरीवरील उपकरणांची नासधूस केली आहे. ज्याची किंमत अंदाजे २५ हजार रुपये आहे. अशा प्रकारचे एकूण १ लक्ष २७ हजार रुपयांचे नुकसान केले आहे.

केबल चोरीला गेल्यामुळे राजुरा बाजार गावाचा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. त्यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करुन चोरटयांना पकडून त्यांना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी सुध्दा निलेश धुर्वे यांनी केली आहे.

# डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनामागील मुख्य सुत्रधार शोधा

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती वरुड पदाधिकाऱ्यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या २० ऑगस्ट रोजी होणाऱ्या १३ व्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या खुनामागचे मुख्य सूत्रधार शोधून काढण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने वरुडचे नायब तहसीलदार अरुण पाटणे यांना महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्यकारिणी सदस्य प्रा. प्रवीण देशमुख आणि अनिल देशमुख यांच्या उपस्थितीत हे निवेदन सादर करण्यात आले.

पुणे सत्र न्यायालयाने या प्रकरणात दोघांना शिक्षा सुनावली असली, तरी खुनामागचे सूत्रधार अजूनही मोकाटच असल्याबद्दल संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, डॉ.दाभोलकरांचा खुन हा विचार संपवण्यासाठी केलेला सुनियोजित कट असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. त्यामुळे यामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, या खटल्यातून वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची झालेली सुटका योग्य नसून, त्याविरोधात सीबीआयने तातडीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी, वाढत्या बुवाबाजीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्राच्या धर्तीवर संपूर्ण देशात जादूटोणा विरोधी कायदा लागू करण्यात यावा, जोपर्यंत या कटाचे सूत्रधार पकडले जात नाहीत, तो पर्यंत विवेकवादी कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका कायम राहील, असा ईशाराही अंनिसच्या वतीने यावेळी देण्यात आला आहे.

# जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात रासयो तर्फे जलसंधारण दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)








**जरुड** – संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने जलसंधारण दिन कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार व डॉ.शशिकांत काळे मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.जी.आर.तडस तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.विनायक भटकर प्रमुख हे उपस्थित होते. अतिथी डॉ.राम कुलसंगे व डॉ.रविकांत महिंदकर हे उपस्थित होते. सर्वप्रथम महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.'जलसंधारण ही काळाची गरज' या विषयावर विचार मांडताना डॉ. विनायक भटकर यांनी पाणी हेच जीवन असून पाण्याचा एक-एक थेंब आपल्यासाठी मौल्यवान आहे, असे प्रतिपादन केले तर डॉ.राम कुलसंगे यांनी पृथ्वीवर जीवसृष्टी जिवंत ठेवण्यासाठी पाणी अत्यंत महत्त्वाचे असून पाण्याचा तुटवडा टाळण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जलसंधारण ही काळाची गरज बनली आहे, असे सांगितले. यावेळी डॉ.रविकांत महिंदकर यांनी सुध्दा मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि पृथ्वी-वरील जीवन टिकवण्यासाठी झाडे लावणे महत्वाचे आहे, यासह विविध प्रकारचे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी डॉ.विनायक भटकर,डॉ.राम कुलसंगे, डॉ.अजय कुकडे, डॉ.रविकांत महिंदकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शशिकांत काळे, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी अर्चना राऊत, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, डॉ.पुजा महाले, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लीलाधर चौधरी, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.रेणुका वानखडे, प्रा.सीमा कानडे, प्रा.तेजश्री घोटकर, प्रा.रुपाली सवई, प्रा.श्वेता लोखंडे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, निलेश बंदे, संतोष चव्हाण, अनिल हरले, दुर्गा हरले तसेच रासेयो स्वयंसेवक हर्षल हिरणवार, पियुष बडोदेकर, चेतन आखरे, प्रज्वल बोळाखे, संजीवनी पवार, कांचन शिंदे, गायत्री भंडारे, शिवम निंभोरकर, हर्षल मधापुरे, भावेश कुबडे, नीराज वानखडे, निखिल भोयर, नितीन उईके, भूषण युवनाते, कार्तिक गोरे, तौफिक शहा, तौफिक कलीम, कृणाल चव्हाण, पवन धुर्वे, यशवंत कुसराम, नेहा कांडलकर इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ.शशिकांत काळे तर आभार प्रा. प्रदीप आवारे यांनी केले.

# जरुडात २४ ऑगस्ट पासुन संगीतमय शिव महापुराण कथेचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जरुड** – श्रावण मास उत्सवानिमित्त स्थानिक श्री भद्रेश्वर नागमंदिर देवस्थान महोत्सव समितीच्या वतीने यावर्षीही २४ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत संगीतमय शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. आठवडी बाजार चौक, जरुड (पेठ) येथे हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

या शिव महापुराण कथेचे प्रवक्ते म्हणुन ह.भ.प.सोपान काळपांडे (आळंदीकर) हे लाभले आहेत. कथा सोहळ्यासाठी तबला वादक सोपान महाराज भटकर, खंजिरी वादक मंगलसिंग महाराज राठोड, हार्मोनियम वादक हर्षाल खरे महाराज, पॅड वादक सागर निवल महाराज तसेच झाकीकार गौरव महाराज तिखिले यांची साथ लाभणार आहे. या धार्मिक सोहळ्या दरम्यान दररोज सकाळी काकडा आरती, शिवयोग व शिवपूजा, दुपारी १ ते ५ वाजता शिवकथा महापुराण तर सायंकाळी ७ ते ९ वाजता हरिपाठ असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ८ ते १० वाजता ह.भ.प.दर्शन गावंडे महाराज यांचे किर्तन तर २८ ऑगस्ट रोजी ह.भ.प.पवन महाराज रोहनकर यांच्या उपस्थितीत भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. २९ ऑगस्ट रोजी बालकिर्तनकार स्वामी येवतीकर महाराज यांचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. ३१ ऑगस्ट रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून १ सप्टेंबर रोजी ह.भ.प.सोपान काळपांडे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर त्याच दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याचा परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री भद्रेश्वर नागमंदिर देवस्थान महोत्सव समिती जरुड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आयटीआयमध्ये मूलभूत सौंदर्यशास्त्र ट्रेड सुरु करा

## सुरळीच्या पायल कोहळे यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरुड येथे मूलभूत सौंदर्यशास्त्र ट्रेड सुरु करण्यात यावे, अशी मागणी सुरळी येथील पायल निलेश कोहळे यांनी प्रादेशिक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाचे सहसंचालक यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, तालुक्यात अनेक विद्यार्थिनींना मूलभूत सौंदर्यशास्त्र ट्रेडचे प्रशिक्षण घेण्याची इच्छा आहे. मात्र शासकीय आय.टी.आय.वरुड येथे ट्रेड उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थिनींना इतर शहरात जावे लागते, ज्यामुळे आर्थिक प्रवासाचा मोठा भार पडतो. त्यामुळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरुड येथे मूलभूत सौंदर्यशास्त्र ट्रेड सुरु करण्यात यावा, यामुळे वरुड व परिसरातील विद्यार्थिनींना त्यांच्या जवळच दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण मिळेल आणि रोजगार संधीही वाढतील, अशी मागणी केली असून या निवेदनावर पुष्पा टेकोडे, पुजा मस्के, किर्ती माकोडे, देव्यानी कोहळे, मंजुषा हुड, पुर्वा गेडाम, संगीता बहुरुपी, सारीका शहाणे, दिपीका लोंढे, प्राजक्ता शिरभाते कोमल वानखडे, खुशी शेकापुरे, योगीता आलोने, पायल कडु, प्रतीक्षा कडु, मयुरी ठाकरे, सारीका हेलोडे, आरती मेश्राम, संगीता धुर्वे, वनिता कळसकर आदींच्या सहया आहेत.

## श्रावण महिन्याचे औचित्य साधून श्री केदारेश्वर संस्थानच्या वतीने

# विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्रावण महिन्याचे औचित्य साधून श्री केदारेश्वर संस्थान वरुड यांच्या वतीने यंदा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांमध्ये भक्तिभाव वाढावा आणि श्रावणोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा व्हावा, यासाठी संस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे.

श्रावणोत्सवानिमित्त १८ ते २५ ऑगस्ट या कालावधीत शिवनाम जप आयोजित करण्यात आला असून दररोज सकाळी व दुपारच्या सत्रात सामुदायिक शिवनाम जप होणार आहे. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ७ ते ८ व दुपारी ३ ते ४ दरम्यान संत श्री सचिन देव महाराज अमरावती यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता काल्याचे किर्तन होणार आहे. २४ ते ३० ऑगस्ट दरम्यान संगीतमय श्री शिवमहापुराणाचे आयोजन करण्यात आले असून शिवकथा प्रवक्ते ह.भ.प.मंगेश महाराज गावंडे हे भाविकांना शिवमहापुराणाची कथा सांगणार आहेत. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. याशिवाय २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० वाजता 'सुंदरकांड' या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्याची प्रस्तुती सियाराम मानस मंडळ वरुड करणार आहे. श्रावणोत्सवाच्या निमित्ताने विविध भजन मंडळांचाही सहभाग राहणार असून राधेराधे भजन मंडळ, माऊली भजन मंडळ, श्री हरी माऊली ग्रुप, योगेश्वर भजन मंडळ आणि सावता भजनी मंडळाचे भजन कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री केदारेश्वर संस्थान वरुडच्या कार्यकारिणीने केले आहे.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

## स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात

# मुख्यमंत्री सुधाकर नाईक जयंती निमित्ताने जलसंधारण दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या रा.से.यो.पथकाच्या वतीने माजी मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सादिक अनवर तर मुख्य अतिथी म्हणुन रा.से.यो.क्षेत्रीय समन्वयक डॉ.शशिकांत काळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ व एनएसएस लक्ष्य गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांचे स्वागत निलम सलामे, प्रा.डॉ.शशिकांत काळे यांचे स्वागत तेजुश्री सोनवणे तर प्रा.अरविंद तट्टे यांचे स्वागत दामिनी देशमुख हिने केले. कार्यक्रमाच्या प्रास्तविकात प्रा.अरविंद तट्टे यांनी माजी मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांनी जलसंधारणासंदर्भात केलेल्या कार्याचा आढावा घेतला व उपस्थितांना जलसंवर्धनाची शपथ दिली. मुख्य वक्ते प्रा.शशिकांत काळे यांनी सुरक्षित भविष्यासाठी पाण्याचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे विशद केले. प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांनी 'जल है, तो कल है' या उक्तीचे महत्व विद्यार्थिनींना समजावुन सांगून जलसंवर्धन करुन आपले भविष्य सुरक्षित करण्याच्या आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन पायल कवडेती तर आभार तेजुश्री सोनवणे हिने मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ.विवेक देशमुख, डॉ.अनिल कडू, डॉ.मनोज राठोड, डॉ.लिना गावंडे, डॉ.फरहीना शिरीन, ग्रंथपाल डॉ.कविता इंगळे, प्रफुल्ल किटुकले, संजय वर्धे व रा.से.यो. स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महा वॉकेथॉन २०२६ मध्ये अभिनेते संजय दत्त यांचा सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वर्धा** – माती आणि जलसंधारणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर' हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या राज्यव्यापी उपक्रमात सहभागी होण्यासाठी अभिनेते संजय दत्त यांना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी निमंत्रित केले असून, त्यांनी हे निमंत्रण स्वीकारले आहे. जलसंधारणाचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचावा आणि हा उपक्रम लोकचळवळीचे स्वरूप धारण करावा, या उद्देशाने लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी–कर्मचारी, विद्यार्थी, कलाकार, खेळाडू, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्य नागरिकांना 'महा वॉकेथॉन'मध्ये सहभागी करून घेण्यात येत आहे.

# प्रशासकांना मोजकेच अधिकार असल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास ठप्प

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतीचा कार्यकाल फेब्रुवारी २०२६ ला संपलेला आहे. सद्य: प्रशासक म्हणुन सरपंच यांच्या माध्यमातुन कार्यकाल सुरु आहे तरी प्रशासक म्हणुन नियुक्त केलेल्या सरपचांना आर्थिक आणि धोरणात्मक अधिकार न दिल्याने ग्रामीण भागातील विकास कामे ठप्प झाली आहेत. सरपंच यांनाच नियुक्त करण्यात आले असले तरी त्यांना केवळ दैनंदिन कामकाजापुरते अधिकार देण्यात आले आहेत, त्यामुळे नवीन विकास कामे मंजुर करणे, निधी खर्च करणे किंवा महत्वाचे प्रशासकीय निर्णय घेणे शक्य होत नसल्याने ग्रामपंचायतीचे कामकाजामध्ये मोठ्या अडचणीत सापडले आहे . जिल्हयातील अनेक ग्रामपंचायतीचा कार्यकाल फेब्रुवारी २०२६ मध्ये संपलेला आहे त्यानंतर ग्रामपंचायत निवडणुक होईपर्यंत प्रशासनात कोणतीही पोकळी निर्माण होऊ नये म्हणुन सरकारने न्यायालयाच्या निर्देशानुसार विद्यमान सरपंचाची प्रशासक म्हणुन नियुक्ती केली. त्यांना केवळ पाणीपुरवठा वीजबिलांची पुर्तता स्वच्छता आणि इतर नियमित स्वरुपाची कामे करण्याचीच परवानगी देण्यात आली आहे. विकास कामांसाठी निधी मंजुर करणे, आर्थिक व्यवहारांना मान्यता देणे किंवा नवीन योजना राबविण्याचे अधिकार त्यांच्याकडे नसल्याने ग्रामपंचायतीच्या विकासाला मोठा ब्रेक लागला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात स्वच्छता नाल्यांची साफसफाई, धुरफवारणी, रस्त्यांची दुरुस्ती गटारींची कामे आणि पिण्याच्या पाण्याशी संबंधित अनेक कामांना प्राधान्य देण्याची गरज असते मात्र आर्थिक अधिकार नसल्याने या अत्यावश्यक कामासाठी निधी खर्च करता येत नाही, यापुर्वी पुर्ण झालेल्या विकासकामांची देयकेही अनेक ग्रामपंचायतीमध्ये अडकुन पडली आहे. प्रशासकांना आर्थिक मंजुरी देण्याचा अधिकार नसल्याने कंत्राटदारांना पैसे अदा करता येत नाहीत. प्रशासक सरपंचांचे म्हणणे आहे की, केवळ नियमित कामकाज चालविण्याचे अधिकार देऊन ग्रामपंचायतीचा कारभार प्रभाविपणे चालविता येणार नाही. प्रशासक सरपंचाचे अजुनपर्यंत मानधन मिळाले नाही तरी प्रशासक हा ग्रामपचायतीचे कामकाज पाहात आहे व लोकांचे म्हणुन ऐकुण घेत आहे तरी शासनाने लवकरात लवकर निवडणुका घ्याव्या व ग्रामीण भागातील विकास कामे मार्गी लावावे, अशी मागणी केला जात आहे.



ग्रामपंचायत प्रशासक म्हणुन सरपंचाची जबाबदारी असली तरी पुरेसे अधिकार नसल्यामुळे गावातील विकास कामे ठप्प झाले आहेत. शेतकऱ्यांच्या गाईच्या गोठ्याच्या अनुदान रक्कम घरकुलाचे अनुदान रखडले आहेत, सरकारने प्रशासकांना आवश्यक आर्थिक अधिकार न दिल्यामुळे ग्रामीण भागाचे नुकसान होत आहे, अशी प्रतिक्रिया टेंभुरखेडाच्या माजी सरपंच तथा प्रशासक रोशनी निंभोरकर यांनी दिली आहे.

# युवा पिढीला एआय बेस तंत्रज्ञानाद्वारे पुढे नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार - महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## मेळघाट महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना संधी

## अमरावती युवा महोत्सव २०२६ चे पालकमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**अमरावती** – युवा पिढीला कृत्रिम बुद्धीमत्ता आधारीत तंत्रज्ञानाचा उपयोग करून विविध कौशल्य आत्मसात करता यावे तसेच त्यांना गती असणाऱ्या क्षेत्रात पुढे घेवून जाण्यासाठी पालकमंत्री म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले. मेळघाट महोत्सवात युवकांना सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची संधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवराष्ट्र युथ फाऊंडेशनच्या वतीने येथील सायन्स कोर मैदानावर आयोजित तीन दिवशीय 'अमरावती युवा महोत्सवा'चे आज उद्घाटन पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार प्रवीण पोटे आणि प्रवीण तायडे, नवराष्ट्र युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष हिमांशु पाटील, ह.भ.प. प्रशांत महाराज ठाकरे आदी यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, युवा महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवक–युवतींची प्रतिभा, सर्जनशिलता आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडणार आहे. अमरावती व विदर्भाच्या मातीचे संस्कार त्यांच्या सादरीकरणातून दिसून येतील. यासोबतच ज्ञान, तंत्रज्ञान व कल्पकतेच्या माध्यमातून आधुनिक भारताच्या उभारणीतही हे युवा आपले योगदान देणार आहेत. राज्य शासनाने एआय बेस तंत्रज्ञानावर भर दिला असून युवकांना या क्षेत्रात पुढे जाण्याकरिता पोषक वातावरण तयार करण्यात येत आहे. अमरावती व राज्यातील युवकांनी यादृष्टीने पुढाकार घ्यावा त्यास राज्यशासन पूर्ण सहकार्य करेल असे सांगत एआयच्या सद्उपयोगावर भर देत दुरुपयोगापासून लांब रहावे असेही त्यांनी सांगितले. येत्या २५ डिसेंबर रोजी चिखलदरा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मेळघाट महोत्सवात युवकांना सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्यकरण्याची संधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नवराष्ट्र युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष हिमांशु पाटील यांनी प्रास्ताविक केले. २३ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या या युवा महोत्सवामध्ये दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६.३० दरम्यान शिक्षणतज्ञांचे व्याख्यान, युथ पार्लमेंट, गरबा नाईट, स्टार्टअप एक्सपो स्पर्धा, अमरावती गॉट टॅलेंट आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ निरसित बाबतच्या प्रारूप अधिनियमावर सूचना व हरकती सादर करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ निरसित करण्याबाबत अधिनियम, २०२६ चे प्रारुप तयार नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या प्रारुपावर नागरिकांनी १४ सप्टेंबर पर्यंत आपल्या सूचना आणि हरकती सादर कराव्यात, असे आवाहन महसूल विभागामार्फत करण्यात आले आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी देशात सुरू केलेल्या भूदान चळवळीच्या पुढील टप्प्यात ग्रामविकासाला चालना देण्यासाठी ग्रामदान मोहिमेची सुरुवात करण्यात आली होती. या चळवळीला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४' लागू केला होता. राज्यात सध्या २० ग्रामदान मंडळे कार्यरत असून, ग्रामदान मंडळ स्थापन झालेल्या गावांमधील विविध अडचणी दूर करण्याच्या अनुषंगाने कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्याअनुषंगाने हा अधिनियम निरसित करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

'महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ निरसित करण्याबाबत अधिनियम, २०२६' च्या प्रारुप अधिनियमाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर तसेच महसूल विभागाच्या विविध समाजमाध्यमांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारुप अधिनियमाबाबतच्या सूचना व हरकती संबंधित तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर कराव्यात. तहसीलदार कार्यालयात प्राप्त झालेल्या सूचना व हरकती जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतील. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त तसेच तहसीलदार कार्यालयांकडून प्राप्त सूचना व हरकतींचे संकलन करून जिल्हाधिकाऱ्यांनी २१ सप्टेंबर २०२६ पर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयाकडे अहवाल सादर करावयाचा आहे. विभागीय आयुक्तांनी प्राप्त सूचना व हरकतींची छाननी करून आपल्या अभिप्रायासह महसूल विभागनिहाय एकत्रित अहवाल ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत शासनाकडे सादर करावयाचा आहे, अशी माहिती महसूल विभागाच्या उपसचिव अश्विनी यमगर यांनी दिली आहे.

# महाराष्ट्राची परंपरा लाभलेल्या ढोल ताशाला जागतिक नामांकन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हजारो युवकांचा सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**नागपूर** – शिक्षण कौशल्य, क्रीडा स्टार्टअप आदी क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग आहे. त्यांचा हा सहभाग वाढविण्यासोबतच संपूर्ण मदत देण्यात येईल त्यासोबत स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी आज दिली.

रेशीमबाग मैदानावर मंथन फॉर युवा या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ हजार पेक्षा जास्त युवक व युवती सहभागी झाल्या होत्या.

महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या मध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल संपूर्ण चमुचे अभिनंदन केले.

२५ हजार पेक्षा जास्त युवकांच्या साक्षीने हा उपक्रम पूर्ण झाला असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजची युवा पिढी सर्वच क्षेत्रात आपल्या कौशल्याने नावलौकिक मिळवित आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सर्वाधिक सहभाग लाभलेल्या ध्वजधारकांच्या समावेशाबद्दल विश्वविक्रमामध्ये नोंद झाली असून यापूर्वी २६० ध्वज धारकांचा समावेश असलेला विक्रम आज मोडीत निघाला आहे.

सुप्रसिद्ध क्रीडा समालोचक रिधिमा पाठक यांनी युवकांचे आयकॉन असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच क्रिकेटपटू तिलक वर्मा, राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक विजेते दिलीप महादू गावित, अर्जुन देशपांडे, किरण शहाजी यांचे सोबत संवाद साधताना विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याची प्रेरणा व अनुभव युवकांसमोर शेअर केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की संविधानामुळेच लोकशाही प्रगल्भ झाली आहे. आपल्या लोकशाहीमुळेच मला नगरसेवक, महापौर, आमदार आणि मुख्यमंत्री या पदापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. आपल्या आकांक्षा व विश्वास पूर्ण करण्यासाठी संविधानामुळेच कुणीही थांबू शकत नाही असे सांगत त्यांनी आपल्या राजकीय व सामाजिक वाटचालीची माहिती युवकांसमोर मांडली. स्टार्टअप संदर्भात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, युवकांना शासनाची संपूर्ण मदत करण्याचे धोरण असून स्टार्टअपसाठी इकोसिस्टीम पॉलिसी तयार करण्यात आली आहे. या धोरणामध्ये युवकांना शंभर टक्के मदत करण्याचा उद्देश असल्याने युवकांसोबत चर्चा करून आणखी चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल असा विश्वास यावेळी त्यांनी दिला.

मुलांमध्ये असलेल्या सर्वाधिक स्क्रीन टाईम बद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मुलांचा स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी विचारमंथन सुरू आहे. स्क्रीनवरून मैदानावर कसे वळता येईल याबद्दलही या क्षेत्रातील तज्ञांकडून निश्चित धोरण ठरविण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी मंथन फॉर युवाचे आयोजक रितेश गावंडे यांनी स्वागत करून या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. १ ते २३ ऑगस्ट पर्यंत या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले असून या उपक्रमातील यशस्वी स्पर्धकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन म्हणून ओळख असलेल्या युवक व युवतींचा गौरव करून त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्याची माहिती देण्यात आली. नशा मुक्त भारत या अंतर्गत युवकांना नशा मुक्तीची शपथ देण्यात आली. यामध्ये अमली पदार्थ मुक्त जीवनशैली, व्यसनापासून दूर राहण्याची प्रतिज्ञा त्यासोबतच अमली पदार्थांचा वापर अथवा विक्री कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. तसेच आपली अमली पदार्थ मुक्त युवा पिढी घडविण्यासाठी सक्रिय सहभाग याबद्दल युवकांना पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी शपथ दिली.

आभार प्रदर्शन आयोजक विष्णू चांगदेव यांनी केले.

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६८६/२०२६ ने.ता.२२/०९/२०२६

**अर्जदार :-**

दिलीप महादेव टाकरखेडे
वय अं.६६ वर्ष, धंदा- मजुरी
रा.ओक कॉलनी, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक ( कोणीही नाही )

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गंगुबाई महादेवराव टाकरखेडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **११/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# उत्पादनांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद : उत्कृष्ट परिणामांचा दावा

## ऑरेंज अल्केमीमध्ये त्वचा निगेसाठी आधुनिक तंत्रज्ञानासोबत नैसर्गिक घटकांचा वापर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – त्वचा निगेसाठी आधुनिक तंत्रज्ञानासोबत नैसर्गिक घटकांचा वापर करणाऱ्या ऑरेंज अल्केमी या ब्रँडच्या विविध उत्पादनांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. भारतीय त्वचेचा पोत, स्थानिक हवामान आणि नैसर्गिक घटकांचा विचार करुन ही उत्पादने विकसित करण्यात आल्याचा दावा कंपनीने केला आहे.




ऑरेंज अल्केमीच्या उत्पादनांमध्ये मायक्रो बॅलन्स + ऑइल कंट्रोल क्लॅरिफायिंग क्लीन्झर हे उत्पादन त्वचेची स्वच्छता आणि अतिरिक्त तेलाचे नियंत्रण यासाठी तयार करण्यात आले आहे. या उत्पादनात झिंक पीसीए आणि आठ वनस्पतीजन्य सक्रिय घटकांचा समावेश असल्याचे कंपनीच्या माहितीत नमूद करण्यात आले आहे. त्वचेला नैसर्गिक चमक मिळवुन देण्यासाठी रेडियन्स ड्यु सिरम हे उत्पादन उपलब्ध आहे. त्वचेचा टोन अधिक समतोल दिसण्यास तसेच त्वचेचा ग्लो वाढण्यास मदत करणारे उत्पादन म्हणून याची माहिती देण्यात आली आहे. त्वचेतील ओलावा टिकवुन ठेवण्यासाठी थ्री-डी मॉइश्चर क्रीम हे उत्पादन असून, त्वचा मऊ, हायड्रेटेड आणि तजेलदार ठेवण्यास मदत करणारे क्रीम म्हणून त्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच सूर्याच्या अतिनील किरणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी मायक्रो-डिफेन्स सनस्क्रीन एसपीएफ ५० पीए उपलब्ध आहे. हे सनस्क्रीन त्वचेवर पांढरा थर न राहण्याच्या वैशिष्ट्यासह असल्याचा कंपनीचा दावा आहे.

ऑरेंज अल्केमीने आपल्या उत्पादनांमध्ये नागपुरी संत्र्यांच्या अर्काला विशेष महत्त्व दिले आहे. वरुड परिसरातील संत्र्यांची उपलब्धता, स्थानिक हवामान आणि नैसर्गिक घटकांचा विचार करुन उत्पादनांची संकल्पना विकसित करण्यात आल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. त्वचेची स्वच्छता, अतिरिक्त तेलाचे नियंत्रण, मॉईश्चरायझिंग, त्वचेचा ग्लो आणि सुर्यकिरणांपासून संरक्षण अशा विविध गरजा लक्षात घेऊन ऑरेंज अल्केमीने उत्पादनांची श्रेणी तयार केली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, या उत्पादनांचा वापर करणाऱ्या ग्राहकांना चांगले तसेच उत्कृष्ट परिणाम मिळत असून उत्पादनांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, कंपनीच्या माहितीनुसार थ्री-डी मॉइश्चर क्रीमला ५.० रेटिंग मिळाले असून ग्राहकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे या उत्पादनांकडे लक्ष वेधले जात आहे. स्थानिक नैसर्गिक घटक आणि आधुनिक स्किनकेअर तंत्रज्ञान यांचा संगम साधत वरुडच्या ऑरेंज अल्केमीने त्वचा निगा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

# दुचाकी-स्विफ्ट अपघातात माजी सैनिकाचा दुर्दैवी मृत्यू

## वरुड-चांदस महामार्गावरील घटना

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** - वाठोडा मार्गावरील चांदस येथे एका भरधाव स्विफ्ट कारने दुचाकीला मागुन जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका माजी सैनिकाचा मृत्यू झाला आहे. अनिल चौधरी असे मृत माजी सैनिक यांचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिल चौधरी हे मूळचे हातुर्णा येथील रहिवासी असून सद्य: ते वरुड येथील विजयनगर परिसरात राहत होते. ते माजी सैनिक होते. गुरुवारी सकाळी नेहमीप्रमाणे ते वरुड येथून



दुचाकीने घोराड येथील त्यांच्या शेताकडे जात होते. दरम्यान वरुड-वाठोडा मार्गावर चांदसजवळ मागुन भरधाव वेगाने आलेल्या एम.एच.४९ बीझेड २३२७ या क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारने त्यांच्या दुचाकीला भीषण धडक दिली. धडक इतकी जबर होती की, अनिल चौधरी हे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्विफ्ट कार चालक घटनास्थळावरुन कारसह पसार झाला. तेथील स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवित चौधरी यांना तातडीने वरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचार सुरु केले असता त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच वरुड ग्रामीण रुग्णालयात नातेवाईक आणि नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. या दुर्दैवी घटनेमुळे चौधरी कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलिसांनी तत्परता दाखवत अपघात घडवणाऱ्या स्विफ्ट कारचा शोध घेऊन कारचालकाला ताब्यात घेतले आहे. वरुड पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# सहायक आयुक्त यांच्या लेखी आश्वासनानंतर आमरण उपोषण मागे : आमदारांचा पुढाकार

## दाभी धरणाच्या ठेक्यावरुन गेल्या ६ दिवसांपासुन तहसिल समोर सुरु होते उपोषण

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** - दाभी तलावच्या ठेका देण्यावरुन विकास मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था आणि प्रगती मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था सुरळी यांच्यामध्ये सुरु असलेल्या वादावादीमध्ये गेल्या ६ दिवसांपासुन तहसिल कार्यालयासमोर सुरु असलेले आमरण उपोषण अखेर आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या मध्यस्थीने आज दुपारच्या सुमारास सोडविण्यात आले.

यावेळी उपस्थित आमदार, अधिकारी आणि उपोषणकर्त्यांमध्ये तिन्ही बाजुने चर्चा करण्यात आली आणि त्यानंतर मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने लेखी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

विकास मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेला मत्स्य व्यवसाय सहकारी सहायक आयुक्त यांनी सहायक निबंधक (दुग्ध) अमरावती यांनी संस्थेच्या उपविधीत दुरुस्ती प्रस्ताव सादर करुन उपविधीत दाभी तलावाची नोंद घेण्याबाबत या कार्यालयास कळविले आहे. सदर उपविधी दुरुस्त झाल्यानंतर दाभी तलाव ठेका कार्यवाहीमध्ये शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल



तसेच आपल्या संस्थेचा सकारात्मक विचार करण्यात येईल. तलाव ठेका समिती मार्फत आपल्या संस्थेचा प्रस्ताव योग्य असल्यास समप्रमाणात (५० टक्के) तलाव ठेक्याने देण्यात येईल. आपले कागदपत्र योग्य असल्यास ५० टक्के ठेका देण्यात येईल. तातडीने समितीची बैठक बोलावुन आपल्या संस्थेच्या मागणीचा शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन मस्त्यव्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त मोंटी मेश्राम यांनी विकास मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे नामदेव कुरवाडे यांना दिल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्ते आणि विरोधकांमध्ये उपस्थितांसमोर चांगलीच हमरीतुमरी झाली.

याप्रसंगी आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, वरुडचे उपविभागीय अधिकारी सौरभ गावंडे, तहसिलदार रामदास शेळके, नायब तहसिलदार पंकज चव्हाण, मस्त्यव्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त मोंटी मेश्राम, ठाणेदार अशोक लांडे, शेंदुरजनाघाट सुवर्णा वरखेडे, नगरसेवक प्रशांत सावरकर, सहायक निबंधक (पदुम) ए.आर.पारीसे आदींसह भोई समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

